# मेंदीच्या सात्त्विक कलाकृतींचे प्रकार

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


- मनोगत ६
- ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य ७
- 'सूक्ष्म' या शब्दाच्या संदर्भातील काही संज्ञांचा अर्थ ११
- काही आध्यात्मिक संज्ञांचा अर्थ १२

१. मेंदीच्या कलाकृती १३

१ अ. मेंदीच्या कलाकृतींचे महत्त्व १३

१ आ. सात्त्विक कलाकृती काढा ! १३

१ आ १. कलाकृतीची स्पंदने अवलंबून असलेले काही घटक १४

अ. आकार (shape) आ. आकारमान (size) १४

इ. दिशा

ई. गतीदर्शकता २३

उ. प्रमाणबद्धता किंवा बांधेसूदपणा (Symmetry) २९

ऊ. रचना ए. समतोल (balance) ३२

ऐ. मोकळी जागा ओ. बंदिस्तपणा ३७

औ. कलाकृतीतील आकारांमधील सलगता ३९

अं. कलात्मकतेपेक्षा नैसर्गिकता हवी ! ४१

क. सारखेपणा (Similarity) किंवा एकमेकांना पूरक (Complementary) असणे ४१

१ आ २. काही सात्त्विक आणि राजसिक कलाकृतींची उदाहरणे ४२

१ आ ३. ५ वर्षांपर्यंतच्या वयोगटातील मुला-मुलींच्या हातापायांवर
मेंदीने काढावयाच्या कलाकृती ६०
१ इ. मेंदी कोणी काढावी ? ६०
**२. मेंदीच्या सात्त्विक कलाकृतींच्या निर्मितीची सेवा करतांना सनातनच्या साधिकांना शिकायला मिळालेली सूत्रे आणि आलेल्या अनुभूती ३०**
**३. विविध सात्त्विक कलाकृती ६५**

# मनोगत

'कला' हे व्यक्तीला ईश्वरप्राप्तीच्या दिशेने नेणारे एक साधन आहे. 'कलेच्या माध्यमातून 'साधना' करणे', म्हणजे 'कलाकृती ईश्वराला अपेक्षित अशी सात्त्विक करण्याचा आणि त्याही पुढे जाऊन एखाद्या देवतातत्त्वाच्या अधिकाधिक जवळ जाणारी, अशी सिद्ध करण्याचा प्रयत्न करणे' होय. प्रथमदर्शनी अगदी साध्या आणि सहजसाध्य वाटणाऱ्या 'मेंदीकले'द्वारेदेखील या प्रकारे साधना करता येऊ शकते. त्या दृष्टीने ईश्वराला अपेक्षित अशा मेंदीच्या सात्त्विक कलाकृती (नक्षी) काढण्यासाठी प्रथम सात्त्विक आणि असात्त्विक यांतील भेद वाचकाच्या लक्षात येणे आवश्यक आहे. यासाठी मेंदीच्या कलाकृतींमध्ये नेहमी वापरण्यात येणाऱ्या विविध आकृत्या, त्यांतील सात्त्विक अन् असात्त्विक आकृत्या कोणत्या, एखादी आकृती सात्त्विक अथवा असात्त्विक कशामुळे ठरते, एखादा राजसिक आकार काढूनही संपूर्ण कलाकृती सात्त्विक कशी करता येते आदी विषयींची माहिती या ग्रंथात दिली आहे. विषय कळण्यास सोपा व्हावा, यासाठी अनेक साधे प्रयोगही दिले आहेत.

मेंदी काढणाऱ्याच्या ईश्वराप्रती असलेल्या भावामुळे एखादी असात्त्विक कलाकृती सात्त्विक झाल्याचीही काही उदाहरणे ग्रंथात आहेत. अर्थात् कलाकृती फारच रज-तमप्रधान असेल, तर ती भावपूर्ण काढल्यासही सात्त्विक होणार नाही, हेही खरे ! याकरता केवळ वाचकांच्या माहितीसाठी काही तामसिक कलाकृतींची उदाहरणे दिली आहेत. या ग्रंथात सात्त्विक अन् देवतांची तत्त्वे आकृष्ट करणाऱ्या काही कलाकृती दिल्या आहेत. या कलाकृती साधिका-कलाकारांना ईश्वरी कृपेमुळे प्राप्त झालेल्या ज्ञानातून साकार झाल्या आहेत. या कलाकृती काढतांना, तसेच 'साधना' म्हणून त्यांचे संगणकीय सादरीकरण करतांना साधिकांना भाव, चैतन्य, आनंद अशा विविध स्तरांच्या अनुभूती आल्या. या मेंदी भावपूर्ण काढणाऱ्यांनाही तशाच अनुभूती येतील.

हा ग्रंथ वाचून मेंदीकलेकडे 'साधना' म्हणून पहाण्याची आणि तिचा अधिकाधिक आध्यात्मिक लाभ करून घेण्याची प्रेरणा वाचकांमध्ये निर्माण होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – संकलक